नि.फौ.ख.क्र.५६/२०२४
सरकार –वि– देवानंद व इतर
निशाणी क्रमांक २०

**सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०१ ची साक्ष शपथेवर सुरू :–**

माझे नाव :– पंकजकुमार मंगलसींग मेहेर
वय :– ४२ वर्ष, व्यवसाय :– पोहेकॉ १४५७,
नेमणुक :– सायबर पोलीस स्टेशन बुलढाणा

**सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरु :–**

१. मी दोन्ही आरोपींना ओळखतो कारण मी त्यांचेविरुध्द कार्यवाही केली होती. मी सन २०२३ साली स्था.गु.शाखा बुलढाणा येथे पोहेकॉ या पदावर कार्यरत होतो. दिनांक २४.०९.२०२३ रोजी स्था.गु.शा येथे कार्यरत असतांना अवैध गौण खनिज उत्खनन करणा–यांवर कार्यवाही करण्याकरीता माझी डयुटी संपुर्ण जिल्हयामध्ये लागली होती. त्या दिवशी शेगांव येथे मी माझ्यासोबत सहकारी निलेश सोळंके, हेड कॉन्स्टेबल हेलोडे, पोकॉ दिपक वायाळ असे आम्ही शासकीय वाहनाने अवैधरीत्या गौण खनिज उत्खनन करणा–यांवर कार्यवाही करण्याकरीता आलो होतो. त्यानंतर एपीआय निलेश सोळंके यांना अशी माहिती मिळाली की वरवट ते शेगांव रोडवर एक पिवळया रंगाचे आयशर कंपनीचे टिप्पर अवैधरीत्या गौण खनिज वाहतुक करीत आहे. अशाा माहीतीवरुन आम्ही व दोन पंच श्री टॉकीज जवळ सापळा रचुन कार्यवाही केली असता अंदाजे १२.०० वाजताचे सुमारास समोरुन विना नंबरचे पिवळया रंगाचे टिप्पर येतांना दिसले, त्यास आम्ही थांबविले व चालकाचे नांव विचारले तेव्हा चालकाने त्याचे नांव देवानंद पहुरकर सांगीतले. त्यानंतर पंचासमक्ष सदर वाहनाची पाहणी केली असता २ ब्रास अवैध गौण खनिज मिळुन आले. सदर वाहनचालकास गौण खनीज बाळगण्याचा परवाना तसेच वाहनाचा परवाना विचारला असता वाहन चालकाकडे सदर दस्तऐवज मिळुन आले नाही. सदर इसमास वाहनाचे नंबर विचारले असता त्याने तोंडी वाहनाचे नंबर एमएच २८ बीबी ४५५९ असे सांगीतले. त्यानंतर त्याला वाहन मालकाचे नांव विचारले असता त्याने शुभम बावणे असे सांगीतले. त्यांनतर आम्ही सविस्तर घटनास्थळ पंचनामा केला व वाहन चालकासह पोलीस स्टेशनला जमा केले. पंचनामा करण्याकरीता पंचाना सुचनापत्र दिले होते. आता मला सदर सुचनापत्र दाखविले. त्यावर पंचाच्या माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येतो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंचाच्या, वाहनचालकाचे व माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येतो. मी सदर घटनेची फिर्याद पोलीस स्टेशनला दिली होती. आता मला फिर्याद व छापील फिर्याद दाखविली. त्यावर माझ्या सहया आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.२३ व २४** देण्यात येतो.

पुढील तपास हेड कॉन्स्टेबल संतोष गवई यांनी केला. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.पी.डी.माने वकील साहेब यांचेमार्फत</u>**

२. मी मागील २० वर्षापासुन पोलीस खात्यात नोकरीवर आहे. मी शेगांव येथे निघण्यापुर्वी बुलढाणा येथे पोलीस स्टेशनच्या स्टेशन डायरीला नोंदी केल्या होत्या. त्या केलेल्या नोंदी तपासाकामी तपास अधिकारी यांना दिल्या नाही. तसेच ज्या शासकीय वाहनाने आम्ही शेगांव येथे आलो व किती लोक आलो त्याबददलची नोंदी देखील घेतल्या होत्या. त्या केलेल्या नोंदी तपासाकामी तपास अधिकारी यांना दिल्या नाही. साक्षीदार स्वताहुन सांगतो की सदर नोंदी त्या परस्पर घेतात. बुलढाणा ते शेगांवचे अंतर ७० किमी चे आहे. बुलढाण्याहुन शेगांव येथे येण्यासाठी दोन ते अडीच तास लागतात. त्या दिवशी आम्ही सकाळी ५.४५ वाजता शेगांवला यायला निघालो. हे म्हणने खरे आहे की एका पोलीस स्टेशनच्या हददीतुन दुस–या पोलीस स्टेशनच्या हददीत कार्यवाही करण्याकामी प्रवेश केल्यानंतर त्याबाबतच्या नोंदी पोलीस स्टेशनला घेतल्या जातात. कार्यवाही करण्यापुर्वी शेगांव शहर पोलीस स्टेशन येथे आम्ही तशी माहिती दिली नाही व नोंदी केल्या नाही. पंचाना श्री टॉकीज चौक येथे फोनद्वारे बोलाविण्यात आले व तेथे त्यांना सुचनापत्र देण्यात आले. हे म्हणने बरोबर नाही की ते पंच माझ्या ओळखीचे होते.

प्रश्न–पंचाच्या क्रमांक तुम्हाला कोठुन मिळाला.

उत्तर– ते तेथेच चौकात हजर होते.

पंचाच्या सहया सुचनापत्रावर कार्यवाही करण्याआधी घेतल्या. हे म्हणने खरे आहे की श्री टॉकीज चौक हा शेगांवातील प्रमुख चौक आहे व तेथे लोकांची वर्दळ सुरु असते. हे म्हणने खरे आहे की कार्यवाहीदरम्यान देखील तेथे वर्दळ होती. ते मला नक्की सांगता येणार नाही की इतर लोकांना पाहिले किंवा नाही. हे म्हणने खरे नाही की सदर कार्यवाही मी वरीष्ठांच्या सांगण्याप्रमाणे केली. माझी कार्यवाही करण्याकरीता नियुक्ती झाली होती. हे म्हणने खरे आहे की गौण खनिज जप्त केल्यानंतर त्याबाबतची माहिती तहसीलला देणे आवश्यक असते.

प्रश्न– गौणखनिज जप्त केल्याबाबतची माहिती तुम्ही तहसीलला दिली होती काय

उत्तर– तो तपासाचा भाग आहे.

वाहनचालकाकडे गौण खनिज वाहतुकीचा परवाना नसल्यामुळे मी अशा निष्कर्षास आलो की सदर गौण खनिज हे चोरीचे आहे. हे म्हणने खरे आहे की तपास पुर्ण झाल्यानंतर ठाण्याचे हददीतुन बाहेर जात असतांना सदर पोलीस स्टेशन येथे त्याबाबतच्या नोंदी घेणे आवश्यक असते. हे म्हणने खरे आहे की, शहर पोलीस स्टेशन येथे कार्यवाहीकरीता येतांना व कार्यवाहीकरुन जातांनाच्या नोंदी मी केल्या नाही. हे म्हणने खरे नाही की माझी कोणतीही

नेमणुक गौण खनिज पथकात केली नाही, मी अशी कोणतीही कार्यवाही केली नाही, कोणताही पंचनामा केला नाही व वरीष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दिली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६.**

**माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 16:52:19 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६**